महाराष्ट्र शासन
# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, टपाल पेटी क्रमांक १००३६, मुंबई ४०० ००१.
WWW.DVET.GOV.IN e-mail: : desk9@dvet.gov.in Fax-२२६५९२३५/२२६७५६२८ Phone No. २२६२०६०४/२९३.

पत्र क्र.०७/सीटीएस/प्रशिक्षण/ २०१७/ ५३७
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०१७

प्रति,
प्राचार्य,
सर्व शासकीय व खाजगी औ.प्र.संस्था .

विषय :- भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई (IIT Bombay) यांचेमार्फत Spoken Tutorial Project (ST) चे कडून उपलब्ध दृकश्राव्य माध्यमातील प्रशिक्षणाबाबत.

वरील विषयास अनुसरुन आपणास सूचित करण्यात येते की, भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचेमार्फत Spoken Tutorial Project (ST) Bombay सुरु करण्यात आला आहे. सदर प्रकल्प हा मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार व भारतीय प्रौद्योगिकी संस्थान, मुंबई यांचा संयुक्त उपक्रम असून त्याचे www.spoken-tutorial.org या संकेतस्थळावर सदर प्रकल्पांतर्गत विविध प्रकारचे कोर्सेस दृकश्राव्य माध्यमातुन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये असणारा व्यवसाय अभ्यासक्रम कोपा, आयसीटीएसएम, डेस्कटॉप पब्लिशिंग ऑपरेटर व जोडारी या व्यवसाय अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक प्रशिक्षण साहित्य वरील संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे दिसून येते. तसेच एम्लॉयबिलीटी स्कील हा सर्व अभ्यासक्रमांसाठी प्रथम वर्षात अनिवार्य विषय असल्याने यामध्ये IT literacy बाबतचे आवश्यक प्रशिक्षण वरील प्रकल्पातुन उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. वरील संकेतस्थळावर सर्व प्रशिक्षणविषयक उपलब्ध असणारे साहित्य दृकश्राव्य माध्यमातुन निशुल्कपुणे औ.प्र.संस्थांना वरील एजन्सीकडून पुरविण्यात येणार आहे.

यास्तव, आपण आपल्या संस्थेतील तज्ञ व अनुभवी निदेशकांना नियुक्त करुन त्यांना Spoken Tutorial Project चे प्रतिनीधी श्रीमती.नीलम कामठेकर समन्वयक, Spoken Tutorial Project (ST) IIT Bombay (मो. ८०८०९७३२००) ईमेल- neelam७८६४७@gmail.com यांचेशी संपर्क साधण्याचे आदेशित करावे व आगामी काळात लवकरच संस्थेत कार्यरत निदेशक वर्ग व प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थ्यांचे प्रशिक्षण आयोजित करण्यासाठी आवश्यक तजवीज करावी.

वरील कार्यवाहीचा अनुपालन अहवाल न चुकता संचालनालयास प्रादेशिक कार्यालयामार्फत सादर करावा.

(योगेश सुरेश पाटील)
उपसंचालक

प्रत :- माहिती व पुढील कार्यवाहीसाठी
१. सहसंचालक, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
२. श्रीमती.नीलम कामठेकर, समन्वयक, Spoken Tutorial Project (ST) IIT Bombay

d:\wagh\h\data 2016\ro letter 16.docx